# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## जाहिरात

कल्याण डोंबिवली महानगरपालिका आस्थापनेवरील खालील रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय/खुला प्रवर्गातील इच्छूक व पात्र उमेदवारांकडून **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| जाहिरात क्रमांक | पदाचे नांव, वर्ग व वेतनश्रेणी/एकत्रित मानधन | एकूण पदे | समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | वि. मा. प्र. | इ. मा. व. | खु ला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/२०१५ | **सिस्टीम मॅनेजर (वर्ग–१)** (पे बॅ.रु.९३००–३४८०० ग्रे.वे.४४००) | १ | सर्वसाधारण | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| ०२/२०१५ | **मुख्य अग्निशमन अधिकारी (वर्ग–१)** (पे बॅ.रु.९३००–३४८०० ग्रे.वे.५४००) | १ | सर्वसाधारण | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| ०३/२०१५ | **उप सचिव (वर्ग–२)** (पे बॅ.रु.९३००–३४८०० ग्रे.वे.४४००) | १ | सर्वसाधारण | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| ०४/२०१५ | **सिस्टीम ॲनालिस्ट (वर्ग–२)** (पे बॅ.रु.९३००–३४८०० ग्रे.वे.४४००) | १ | सर्वसाधारण | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| ०५/२०१५ | **स्थानक अधिकारी (वर्ग–३)** (पे बॅ.रु.९३००–३४८०० ग्रे.वे.रु.४३००) | २ | सर्वसाधारण | — | १ | — | — | — | — | — | — | १ |
| ०६/२०१५ | **उप स्थानक अधिकारी (वर्ग–३)** (पे बॅ.रु.९३००–३४८०० ग्रे.वे.रु.४२००) | १ | सर्वसाधारण | १ | — | — | — | — | — | — | — | — |
| ०७/२०१५ | **ड्रायव्हर–कम–ऑपरेटर (वर्ग–३)** (पे बॅ.रु.५२००–२०२०० ग्रे.वे.रु.२४००) | ९ | सर्वसाधारण | — | — | १ | — | १ | — | — | — | ७ |
| ०८/२०१५ | **फायरमन (अग्निशामक) (वर्ग–३)** (पे बॅ.रु.५२००–२०२०० ग्रे.वे.रु१९००) | ४६ | सर्वसाधारण | २ | २ | १ | १ | २ | — | — | ४ | ४ |
| | | | माजी सैनिक | १ | २ | — | — | १ | — | — | १ | २ |
| | | | प्रकल्पग्रस्त | — | १ | — | — | — | — | — | — | १ |
| | | | महिला | १ | ४ | १ | १ | १ | — | — | २ | ४ |
| | | | खेळाडू | — | १ | — | — | — | — | — | — | १ |
| | | | होमगार्डस | — | १ | — | — | — | — | — | — | १ |
| | | | पदवीधर/ पदवीकाधारक/ अंशकालीन | — | १ | — | — | — | — | — | १ | १ |

**[२]** **शैक्षणिक अर्हता/अनुभव** (अर्ज करतेवेळी उमेदवाराने पदनिहाय अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

**०१) सिस्टीम मॅनेजर :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता आणि,

ब) डेटा सेंटर ॲडमिनीस्ट्रेशन, नेटवर्किंग (लॅन, वॅन, Componunt) हार्डवेअर मधील ५ वर्षाचा अनुभव

**०२) मुख्य अग्निशमन अधिकारी :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची रसायनशास्त्र या विषयासह पदवी व नागपूर येथील राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचा विभागीय अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण, किंवा मान्यताप्राप्त विद्यापिठाची अग्निशमन अभियांत्रिकी विषयातील पदवी आणि,

ब) अग्निशमन अधिकारी / विभागीय अधिकारी पदावरील कामाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आणि,

क) शारीरीक पात्रता :– अ) उंची– १६५ सें.मी., ब) वजन– ५० किलो, क) छाती– ८१ सें.मी., फुगवून– ८६ सें.मी. ड) दृष्टी– चांगली.

**०३) उप सचिव :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आणि एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण.

ब) विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य.

**०४) सिस्टीम ॲनालिस्ट :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता आणि,

ब) सिस्टीम ॲनालिसिस/प्रोग्रामींग/सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमधील ५ वर्षाचा अनुभव.

०५) **स्थानक अधिकारी** :–
अ) उमेदवार विज्ञान रसायनशास्त्र शाखेतील पदवी धारण करणारा असावा, आणि
ब) देशातील कोणत्याही राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय/विद्यापिठ येथून केंद्र अधिकारी हा पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेला असावा.
किंवा
क) देशातील कोणत्याही राष्ट्रीय अग्निशमन विद्यालय/विद्यापीठ येथून अग्निशमन अभियांत्रिकी मधील पदवी धारण केलेला असावा.
ड) ५ लाखापेक्षा कमी लोकसंख्या नसलेल्या शहरातील कोणत्याही प्राधिकरणातील उप स्थानिक अधिकारी/स्थानिक अधिकारी म्हणून ३ वर्षपेक्षा कमी नसेल एवढा अनुभवा असावा

०६) **उप स्थानक अधिकारी** :–
अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची रसायनशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी आणि
ब) राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय नागपूर येथील उप स्थानक अधिकारी पाठ्यक्रम पूर्ण आणि
क) शारीरीक पात्रता – (अ) उंची–१६५ सें.मी., (ब) वजन–५० किलो,
(क) छाती–८१ सें.मी. फुगवून–८६ सें.मी., (ड) दृष्टी– चांगली

०७) **ड्रायव्हर–कम–ऑपरेटर** :–
अ) उमेदवार माध्यमिक शाळा प्रमाणपत्र उत्तीर्ण असावा आणि,
ब) मोटर वाहन अधिनियम १९८८ अन्वये अवजड वाहन परवाना धारण केलेला असावा आणि
क) अवजड मोटर वाहने चालविण्याचा आणि देखभाल करण्याचा ५ वर्षपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असावा.

०८) **फायरमन (अग्निशामक)** :–
अ) उमेदवार एस.एस.सी. आणि राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रामधून फायरमन कोर्स उत्तीर्ण असावा.
ब) शारीरीक पात्रता – (अ) उंची–१६५ सें.मी., (ब) वजन–५० किलो,
(क) छाती–८१ सें.मी. फुगवून–८६ सें.मी., (ड) दृष्टी– चांगली

## [३] वयोमर्यादा :–
३.१ उमेदवाराचे वय दिनांक ०१.०६.२०१५ रोजी १८ वर्षे पूर्ण, खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे राहील.
३.२ मुख्य अग्निशमन अधिकारी, उपसचिव या पदांसाठी खुल्या प्रवर्गासाठी कमाल ४० वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ४५ वर्षे राहील.
३.३ माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.
३.४ (१) स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य (२) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी (३) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी (४) शासकीय सेवेतील कर्मचारी (५) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त उमेदवार (६) अपंग उमेदवार इत्यादींसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.
३.५ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादा ५ वर्षाकरितां शिथिल करता येईल.
३.६ अंशकालीन कर्मचारी उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

**टीप** :–
१. भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
२. पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार **आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण** यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
३. सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना/निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बदल झाल्यास त्या –त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती सर्वांवर बंधनकारक राहील.

## [४] उमेदवाराने सादर करावयाची कागदपत्रे :–
उमेदवाराने खालील प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व सुस्पष्ट दिसतील अशा प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (Attested) आणणे आवश्यक आहे. केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी,पोस्टमास्तर,मुख्याध्यापक तसेच विशेष प्राधिकृत प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या दाखल्याच्या सत्यप्रती ग्राह्य धरल्या जातील.
४.१ शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/गुणपत्रके.
४.२ जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला/शालांत परीक्षा प्रमाणपत्र.
४.३ आरक्षित मागासप्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४.४ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी–२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब, दि.१२/१२/२०११ मधील तरतूदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी. मधील आदेशाच्या अधिन राहून तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.